|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

**संलग्नता विभाग**

जाक्रं.कबचौउमवि/5/362/2025. दि. 6/1/2026.

**अत्यंत महत्त्वाचे परिपत्रक**

**प्रति,**
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या
सर्व महाविद्यालयांचे मा.प्राचार्य आणि मान्यताप्राप्त संस्थाचे मा. संचालक यांना..

**विषय:-** संलग्नता शुल्कात दि. 1 जानेवारी 2026 पासून वाढ करणेसंदर्भात.
**संदर्भ:-** 1.NMU/5/Affiliation fee/686/2008, Dt.3.10.2008 नुसार Direction No.03/2008.
2.मा. व्यवस्थापन परिषद ठराव क्रं.व्य.प.ए-232/2025, दि. 11.11.2025.
3.मा. विद्या परिषद ठराव क्रं.वि.प.ए.97/2025, दि. 17.12.2025.

**महोदय**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने मा. विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालये/परिसंस्था यांचेकडून Direction No.03/2008 मध्ये नमूद केल्याप्रमाणे संलग्नता शुल्क आकारण्यात येते. विद्यापीठाने सन 2008 पासून आकारण्यात येणाऱ्या संलग्नता शुल्कात आजतागायत कोणतीही वाढ केलेली नसल्याने संलग्नता शुल्कात वाढ करणेसंदर्भातील विषय विद्यापीठाचे विचाराधीन होता. त्या अनुषंगाने संलग्नता शुल्कात वाढ करणेबाबत विचारविनिमय करून धोरणात्मक निर्णय घेणेसाठी समिती नियुक्ती करण्यात आलेली होती. सदर समितीने संलग्नता शुल्कात वाढ करणेसंदर्भात विचारविनिमय करून ज्या शिफारशी केलेल्या आहे त्यास मा.व्यवस्थापन परिषदेने ठराव क्रं.व्य.प.ए-232/2025, दि. 11.11.2025 व मा. विद्या परिषदेने ठराव क्रं.वि.प.ए. 97/2025, दि. 17.12.2025 अन्वये मान्यता प्रदान केली आहे.

त्यानुसार आजमितीस जे संलग्नता शुल्क आकारण्यात येत आहे त्या संलग्नता शुल्कात दि. 1 जानेवारी 2026 पासून 15% वाढ करण्यात येत आहे. तसेच दर तीन वर्षांनी संलग्नता शुल्कात 5% वाढ करण्यात येईल.

त्या अनुषंगाने दि. 1 जानेवारी 2026 पासून आकारण्यात येणाऱ्या संलग्नता शुल्काचा तक्ता OAASIS या संगणक प्रणालीवर उपलब्ध करून देण्यात आला असून दि. 1 जानेवारी 2026 पासून तक्त्यात नमूद केल्यानुसार संलग्नता शुल्काची आकारणी करण्यात यावी.

कृपया सदर बाब महाविद्यालय/परिसंस्थेच्या सर्व संबंधितांचे निदर्शनास आणून देवून विद्यापीठास सहकार्य करावे ही विनंती.

टीप:- सुधारीत संलग्नता शुल्काचा तक्ता OAASIS या संगणकप्रणालीवर उपलब्ध करून देण्यात आला आहे.

(डॉ.विनोद पी. पाटील)
(कुलसचिव)